# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे -४

सर्व्हे नं. ८३२ अ, फायनल प्लॉट क्र. १७८/१७९, बी.एम.सी.सी.रोड,
बालचित्रवाणी शेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे -४११ ००४

फोन नं. - ०२० -२५७०५००० फॅक्स नं. - २५७०५१२२/२५६६५८०८

कालमर्यादीत/तात्काळ

क्र.रा.मं./पापुअ/ ९५३८
दिनांक- २५.०३.२०२१

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

विषय-इ.११वी व १२वीचे मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुण विभागणी, प्रात्यक्षिक/तोंडी/तत्सम गुणदान योजनेच्या संदर्भात विषय शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रशिक्षणाबाबत...

संदर्भ - १.शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.(२४३/१९)एसडी-४,दि.८ ऑगस्ट २०१९
२. या कार्यालयाचे क्रमांक रा.मं./पापुई/अ/४६९५ दि. ९/११/२०२० चे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयानुसार मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ.१२वी, १. आरोग्य व शारीरिक शिक्षण २. चित्रकला ३. संकल्पचित्र व रंगकाम ४. चित्रात्मक संकल्प ५.कलेचा इतिहास व रसग्रहण ६.भारतीय संगीताचा इतिहास व विकास ७. कंठ सुगम संगीत ८. कंठ शास्त्रीय संगीत ९. वाद्यसंगीत १०.तालवाद्य या दहा विषयांसाठी सुधारित मूल्यमापन आराखडे, घटकनिहाय गुणदान योजना/प्रात्यक्षिक/तोंडी/ तत्सम गुणदान योजना इत्यादी संबंधित विषय तज्ज्ञांकडून तयार करण्यात आलेल्या आहेत. सदर मूल्यमापन आराखडे व त्या अनुषंगिक बाबींचे विषयनिहाय प्रशिक्षण हे राज्य मंडळ तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विदया प्राधिकरण), पुणे व महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, (बालभारती), पुणे या कार्यालयांमार्फत एकत्रितरित्या आयोजित करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/क.महाविदयालयातील उपरोक्त विषयांचे विषय शिक्षकांसाठी सदर प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. कोविड-१९, कोरोनाच्या प्रदुर्भावाची परिस्थिती पहाता, हे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येत आहे.

या विषयाचे प्रशिक्षण ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने, सदर प्रशिक्षणासाठी विषय शिक्षकांना नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी नाव नोंदणी प्रपत्र तयार करण्यात आले असून, सदर विषय शिक्षकानी मंडळाकडे सादर करावयाचे नोंदणी प्रपत्र मंडळाच्या **evaluation.mh-hsc.ac.in** संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. राज्यातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयातील विषय शिक्षकांनी दि.२२

1205 हा.आ. 
26/3

ते २८ मार्च, २०२१ या कालावधीतच मंडळाकडे ऑनलाईनने नोंदणी करावयाची आहे. शिक्षकांनी आवश्यक ऑनलाईन माहिती भरल्यानंतर त्यातील माहितीचे मुख्याध्यापक/ प्राचार्य यांनी अवलोकन करुन सदर माहिती प्रमाणित करावयाची आहे यासाठी शिक्षकांनी त्यांच्या मुख्याध्यापक /प्राचार्य यांच्या फॉर्ममध्ये नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर आलेला OTP नोंदवून माहिती Submit करावयाची आहे. विषय शिक्षकांनी या पध्दतीने ऑनलाईन नोंदणी केल्यानंतरच संबंधित विषय शिक्षकांस प्रशिक्षणासाठी मंडळाकडून Link प्राप्त होणार आहे. याकरिता विषय शिक्षकांनी एकदाच नाव नोंदणी प्रपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. जे शिक्षक प्रपत्रांव्दारे मंडळाकडे नाव नोंदणी करणार नाहीत अशा विषय शिक्षकांना प्रशिक्षणामध्ये सहभागी होता येणार नाही. सदर प्रपत्रासंबंधीच्या सूचना मंडळाच्या नोंदणी प्रपत्रासोबत देण्यात आलेल्या आहेत. तसेच विषय, तारीख, वेळ, सत्र इ. माहिती संबंधित नोंदणी केलेल्या विषय शिक्षकांना त्यांच्या मोबाईलवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र (विदया प्राधिकरण), पुणे यांच्यामार्फत कळविण्यात येणार आहे.

तरी आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयांना सदर ऑनलाईन प्रशिक्षणासंबंधी परिपत्रकाव्दारे तात्काळ / आजच कळविण्यात यावे. तसेच विषयशिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी नोंदणी करण्याचे आवाहन स्थानिक दैनिक वृत्तपत्र व सर्व दृकश्राव्य प्रसार माध्यमातून विनामूल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही आपल्यामार्फत करण्यात यावी, यांची नोंद घ्यावी.

सोबत, प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी सूचनांचे प्रपत्र.

(डॉ. अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

क्र.कोविमं/उ.मा./गोप./२०२१/ 7586
दिनांक :- २६.०३.२०२१

इ.११ वी व इ.१२ चे मूल्यमापन आराखडे,घटकनिहाय गुण विभागणी, प्रात्यक्षिक /तोंडी /तत्सम गुणदान योजनेच्या संदर्भात विषय शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन प्रशिक्षणाबाबतच्या उपरोक्तच्या प्रकटनाचे अवलोकन होवून पुढील योग्य ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी.

(देविदास कुलाळ)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

प्रति,प्राचार्य,सर्व कनिष्ठ महाविद्यालये/सातारा/सांगली /कोल्हापूर

# प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी ऑनलाईन नोंदणी व प्रशिक्षणासाठी सूचना

१) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी प्रशिक्षणासाठी नाव नोंदणी करताना सर्व माहिती अचुक भरुन फार्म सबमिट करावयाचा आहे. अपूर्ण भरलेला फॉर्म स्विकारला जाणार नाही.

२) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी ते शिकवित असलेले मुख्य विषय व त्या सोबतच इतर विषय शिकवित असल्यास ते क्रमाने नोंदवावेत. शिक्षक प्रत्यक्ष शिकवित असलेले जास्तीत जास्त ४ विषय प्रशिक्षणासाठी नोंदविता येतील. तथापि संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांनी सदर शिक्षक हे विषय शिकवित असल्याबाबत प्रमाणित करणे आवश्यक आहे.

३) फार्म भरताना कोणतेही विरामचिन्हे वापरु नयेत.

४) आपल्या उच्च माध्यमिक शाळेचा 'सांकेतांक' व 'यु-डायस' क्रमांक टाकल्यावर आपण कार्यरत असलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची मंडळाकडे संग्रहित असलेलेली माहिती आपोआप दर्शविण्यात येईल, ती पुन्हा भरण्याची आवश्यकता नाही.

५) माहिती देवनागरी लिपी-Unicode व इंग्रजीत भरता येईल.

६) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी अलिकडच्या काळातील फोटो स्कॅन करुन JPEG किंवा JPG फॉर्मेट मध्येच अपलोड करावयाचा आहे. कागदावर सही करुन ती स्कॅन करुन अपलोड करावयाची आहे. फोटो व सहीची साईज जास्तित जास्त 256kb असावी. जास्त kb साईज असलेले फोटो किंवा सही अपलोड होणार नाही.

७) प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी नोंदणी फॉर्म भरुन सबमिट केल्यानंतर प्रशिक्षणार्थींनी त्यांच्या प्राचार्यांच्या दिलेल्या मोबाईल क्रमांकावर OTP जाईल, प्राचार्यांच्या मोबाईल क्रमांकावर आलेला OTP टाकल्या नंतरच प्रशिक्षणार्थ्यांची नोंदणी पुर्ण होईल व प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणासाठी पात्र होईल त्यांनाच प्रशिक्षणाची लिंक प्राप्त होईल.

८) अपुर्ण भरलेला फॉर्म सबमिट होणार नाही, त्यामुळे त्यांची नोंदणी होऊ शकणार नाही, याची नोंद घ्यावी.

९) प्रशिक्षण पूर्ण केल्यावर सदर फॉर्मचा Part-B भरावयाचा आहे. तो भरुन सबमिट केल्यावर ई-प्रमाणपत्र जनरेट होईल. त्याची प्रिंट प्रशिक्षणार्थी यांना घेता येईल, त्याची एक प्रत प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालय प्रमुखांकडे जमा करावयाची आहे.

१०) लिंक मर्यादीत काळासाठी असल्याने विहित मुदतीत फॉर्म भरावेत, मुदतीनंतर लिंक बंद होईल. प्रशिक्षणासाठीची लिंक पाठविताना कोणत्या ॲपच्या माध्यमातून आपल्या विषयाचे प्रशिक्षण होईल ते कळविण्यात येईल.

***